# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ३४०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०७/२०१८

**१) सोन्या– चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी : –**

दिनांक २९/०६/२०१८ चे १८.०० ते ०२/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे मागील दाराचा इंटरलॉक तोडुन आत प्रवेश करुन घरातील व घरात ठेवलेल्या आलमारीचे लॉक तोडुन १ जोड चांदीचे कळे वजन ४० ग्रॅम, ६ नग चांदीच्या आंगठया वजन २५ ग्रॅम, ५ नग देव्हाऱ्यातील चांदीच्या मुर्त्या वजन ८० ग्रॅम, २ नग चांदीचे जोडवे वजन २० ग्रॅम, सोन्याची रिंग ५ ग्रॅम, व नगदी ५,०००/–रु. असा एकुण २२,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यशवंत हंबर फुडे वय ५८ वर्ष, रा. विनोबा नगर तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) आदेशाचे उल्लंघन करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०३/०७/२०१४ ते १६.३० ते १८.३० वाजता दरम्यान यातील हद्दपार आरोपी हा मा. उपविभागीय दंडाधिकारी तुमसर यांचे हद्दपारीचे आदेश क्र. मा. प्र. ०२/१७ कलम ५७ मपोका प्रमाणे आदेश पारीत दिनांक १५/०७/२०१७ अन्वये हद्दपार असतांना मा. न्यायालयाची कुठलीच परवानगी न घेता शहारात मिळुन आल्याने व मा. न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भोंगाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) विद्युत कंनेक्शन लावुन देतो असे म्हणुन विद्युत कम्पनीची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०३/०७/२०१८ चे पुर्वी पासुन यातील आरोपीने लवादा गवचे ८ नागरिकांकडून लबाडीने प्रत्येकी ५००/–रु ते १५००/–रु घेवुन तुम्हाला महावितरण कंम्पनी कडून विद्युत कंनेक्शन लावुन देतो असे म्हणुन प्रत्येक नागरीकांचे मिळुन एकुण ८,२००/–रु. घेवुन विद्युत कम्पीनीची फसवणुक केल्याने फिर्यादी सचिन शालीकराम चाफेकर वय २६ वर्ष रा. गोबरवाही यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४२० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**४) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०३/०७/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पती हा येण्या–जाण्याचे रस्त्यावरील लाकडे,गोटे (दगड) उचलत असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन जाणे – येण्याचे रस्त्यावर अडथळा निर्माण करुन फिर्यादीचे पती सोबत भांडण करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारपीट केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. हर्षा खुशाल पडोळे वय ३५ वर्ष, रा. ब्रम्ही यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ५०९,३४१,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन लोखंडी काता घेवुन मारण्यास धावल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०२/०७/२०१८ चे १४.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी विवेक कोठीराम लेंडे वय २६ वर्ष, रा. खमारी हा त्याचे आई व भावा सोबत एसडीपिओ कार्यालय भंडारा येथे पेशी तारखेवर आले असता यातील आरोपीतानी संगनमत करुन मोटार सायकलने येवुन आरोपी क्र. १ यांनी हातात लोखंडी काता घेवुन फिर्यादीस व भाऊसाळा यांना तुमचा मर्डर करतो? असे म्हणुन मारण्यास धावल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे अप क्र. ०२४०/१८ कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम ५०६ (बी),३४ भांदवि गुन्हयाचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. खाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम ५०६(बी),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) विद्युत खांबावर अनाधिकृत रित्या विना परवाना बॅनर लावलेले मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०३/०७/२०१८ चे १३.१५ ते १४.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने सार्वजनिक रस्त्याचे जागेवर व विद्युत खांबावर अनाधिकृत रित्या विना परवाना शिवसेना पक्षाचे भंडारा शहर युवा सेना तर्फे श्री. नरेन्द्र भांडेकर यांचे वाढदिवसाचे हार्दीक शुभेच्छा बाबत बॅनर लावलेले मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ महाराष्ट्र मालमत्ता विद्रूपीकरण प्रतीबंधक अधिनीयम १९९५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) नौकरीचे आमीष दाखवुन खात्यातुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २२/०६/२०१८ चे १५.०० ते २८/०६/२०१८ चे १५.०० वाजात दरम्यान यातील फिर्यादी हिने दिनांक १८/०६/२०१८ रोजी नौकरी डॉट काम या आनलाईन साईटवर नौकरी मिळण्याकरीता फॉर्म भरला असता घटना ता. व वेळी यातील आरोपीतांनी फोन व्दारे फिर्यादीस नौकरीचे आमीष दाखवुन तिची वैयक्तीक माहीती व एटीएम कॉर्ड चा नंबर, ओटीपी नंबर, सिव्हीवी नंबर मागुन फिर्यादीचे खात्यातुन वेळोवेळी एकुण २६,९५०/–रु. काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी सौ. शुभांगी मनोज कोल्हे वय ३२ वर्ष, रा. केशवनगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(सी) आय. टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. ताजणे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) बॅगमधील सोन्याची गळसोलीची चोरी : –**

दिनांक ०२/०७/२०१८ चे ११.०० वाजता पुर्वी ही तिचा जावई सुरेंद्र फुंडे हे किरायाने राहत असलेल्या घरी घराचे समोर दार उघडा ठेवुन हजर असतांना कोणीतरी आात आरोपीने घराचे खुल्या दारातुन आत प्रवेश करुन बेडरुम मध्ये ठेवलेल्या बॅग मधुन १ पदक असलेली सोन्याची गळसोली वजन अंदाजे २ तोळे किंमती ४०,०००/–रु. ची चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. प्रभा गणेशराव पातोडे वय ४६ वर्ष, रा. माधवटोला ता. जि. बालाघाट(म. प्र.)ह.मु. संत कबिर वार्ड प्रोफेसर कॉलोनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) मोटार सायकलच्या चालकांच्या निष्काळजीपणामुळे रिक्शा चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०२/०७/२०१८ चे २३.०९ वाजता दरम्यान यातील फिर्यादी लहानु हरी उके वय ५० वर्ष, रा. कुंभली हा आपल्या ताब्यातील रिक्सा घेवुन पायदळ गावाकडे जात असतांना मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन रिक्शास मागेहुन धडक मारुन फिर्यादी यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१०) जनावरांना डांबुन कोबुन निर्दयतेची वागणुक देवुन वैद्यकिय प्रमाणपत्र सोबत न बाळगता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०३/०७/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच ३६ एफ १६५८ किंमती २,००,०००/–रु ची मध्ये एकुण १० लालसर रंगाचे गोरे, गोरी(जनावरे) किंमती ३०,०००/–रु. चे मध्ये डांबुन, कोंबुन त्यांना निर्दयतेची वागणुक देवुन जनावराचा चारापाणी, वैद्यकिय प्रमाणपत्र सोबत न बाळगता अवैद्य वाहतुक करित असतांना कारधा टि पाईट येथे मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भगत वानीशा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१)(ड)(इ)प्रा.नि.वा.का.सहकलम ५(अ)(१)प्रा. सं. अधि सहकलम ६६/१९२ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**११) अवैध हातभट्टी दारू /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी येथे अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू किंमती १,०००/–रु. व जुगारातुन किंमती २००२/–रु. असा एकुण किंमती ३,००२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी १, तीन सिटर वाहनाकरीता– ०९ ईतर वाहनांवरती – ११२ केसेस करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(सपोनी एच. एम रायपुरे)
पोलीस नियत्रंण कक्ष अधीकारी भंडारा
दुरध्वनी.क्र.९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता